**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरीचिंचवड आयुक्तालय**
**पत्ताः- यमुणानगर, निगडी,पुणे.**
**इमेल आयडी :- piantideco.pcpc-mh@gov.in**

**प्रेसनोट दिनांक- ०६/०७/२०२३**

**खुनाच्या प्रयत्नात असलेल्या प्रमोद सांडभोर टोळीतील ०५ आरोपींना अटक, ०७ पिस्टल व २१ राऊंण्ड जप्त करून त्यांचेवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधित कायदयान्वये कार्यवाही**

मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे सो. यांनी पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची बातमी प्राप्त करुन त्यांचे विरुध्द कडक कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले होते.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखे कडील दरोडा विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक जितेद्र कदम, अधिकारी व अंमलदार हे अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमांची गोपनीय बातमी प्राप्त करीत असताना **पोलीस नाईक १४५८ आशिष बनकर व पोलीस शिपाई २६७३ सुमित देवकर** यांना मिळालेल्या बातमीवरुन दि.२५/०६/२०२३ रोजी २०/१५ वा दरम्यान तळेगाव दाभाडे एस टी बस स्टॅण्ड परिसरातुन सराईत आरोपी **टोळी प्रमुख** १. **प्रमोद सोपान सांडभोर** वय - ३३ वर्षे, रा तळेगाव स्टेशन जवळ, हरणेश्वर वाडी, बौध्द विहार जवळ, तळेगाव दाभाडे, पुणे २. **शरद मुरलीधर साळवी,** वय - ३० वर्षे, राधनगर बाबा मंदीर मागे, ज्ञानेश्वर कॉलनी, काळेवाडी, पुणे. मुळ रा - महारवाडा, अवहातरबाला, बदनापुर, जालना यांना त्यांचेकडील **मारुती सुझुकी ऑल्टोकार सह ताब्यात घेवुन १,६०,००० /- रुपये किंमतीचे ०४ गावठी पिस्टल,७,००० /- रुपये किंमतीचे १४ जिवंत काडतुसे (राऊंड)** जप्त करण्यात आले होते. सदरबाबत **तळेगांव दाभाडे पोलीस स्टेशन,येथे गु.र.नं.२९५/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५), भा.द.वि.क. ३४ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ अन्वये** गुन्हा दाखल करण्यात येवुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा,हे करीत होते.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील आरोपींकडे केलेल्या तपासामध्ये त्यांनी त्यांचे साथिदार नामे **१. अमित जयप्रकाश परदेशी** वय - ३१ वर्षे रा. २७५ डोळसनाथ मंदीराशेजारी तळेगांव दाभाडे पुणे. २. **मंगेश भिमराव मोरे**, वय ३० वर्ष, रा माळी नगर वडगाव मावळ ता मावळ जि पुणे. व ३. **अनिल वसंत पवार,** वय ३९ वर्षे, रा. सिध्दार्थनगर, इंद्रायणी कॉलेज शेजारी तळेगाव दाभाडे ता- मावळ, जि- पुणे. यांना अटक करण्यात येवुन त्यांनी त्यांचा आरोपी साथिदार नामे ४. **अक्षय उर्फ आर्ची विनोद चौधरी** वय २८ वर्ष रा.सिदधार्थनगर तळेगाव दाभाडे ता मावळ जि पुणे. ५. **देवराज रा. जळगाव जामोद, बुलढाणा** याचेसह मिळुन मयत इसम नामे किशोर आवारे, रा तळेगाव दाभाडे, मावळ, पुणे यांचे मृत्युचा बदला घेण्यासाठी विशिष्ट व्यक्तीवर हल्ला करण्याचा कट रचला असल्याचे निष्पन्न झाले. सदर आरोपीकडुन तपासा दरम्यान एकुण ०७ पिस्टल व २१ जिवंत काडतुसे (राऊंण्ड), एक लोखंडी कोयता व एक लोंखडी तलवार असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरचे आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हे करणारे गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द **खून खूनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, जबरी चोरी, खंडणी, सदोष मनुष्यवघाचा प्रयत्न, बेकायदेशीर जमाव जमवुन गाडयांची तोडफोड करुन जाळपोळ करणे व बेकायदेशीररित्या अग्नीशस्त्र जवळ बाळगणे असे एकुण २६ गुन्हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे ग्रामीण, अहमदनगर** जिल्हयाचे अभिलेखावर दाखल असल्याने तसेच वरील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवुन हिंसाचाराचा वापर करुन वर्चस्वासाठी व आर्थिक फायदयासाठी संघटीत करुन गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरुध्द दि.०४/०७/२०२३ रोजी मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांनी **महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (ii) ३ (४)** या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत केले असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास श्री सतिश माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिचवड हे करीत आहे.

**आरोपी विरुध्द दाखल असलेले गुन्हे टोळी प्रमुख- प्रमोद सोपान सांडभोर**

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| **१. प्रमोद सोपान सांडभोर, वय ३३ वर्षे, रा. हारनेश्वर वाडी, बौध्द विहार जवळ, तळेगाव दाभाडे, पुणे** | | |
| १. | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |
| २. | M तळेगांव | २२२/२०२२ भादंवि.३०८,४२७,३४ |
| ३. | तळेगाव | ४०४/२०२२ भादंवि.५०६, अ.जा.अ.ज. कलम ३(१)क्यु.आर. |
| ४. | कामशेत | २५२/२०२२ भादंवि. ३०७,३२६ |
| ५. | तळेगाव | ८०४/२०१९ भादंवि.३२४,३३६,३३७,४२७ |
| ६ | तळेगाव | ५९०/२०१९ भादंवि.३२४,३२३,५०४,५०६,३४ |
| ७ | तळेगाव | ६४३/२०१८ भादंवि.३२४,३२३,५०४ |
| **२. शरद मुरलीधर साळवी, वय ३० वर्षे, रा ज्ञानेश्वर कॉलनी, काळेवाडी, पुणे.** | | |
| १. | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |
| २ | कोपरगाव | ८८/२०२० भादंवि ३०२, रॉयट |
| ३ | चाकण | ६४२/२०१९ भादंवि. आर्म ॲक्ट ३(२५) |
| ४ | चाकण | ६२२/२०१९ भादंवि.३४१,३२३,४२७,३४ |
| **३. अमित जयप्रकाश परदेशी, वय ३१ वर्षे रा. २७५ तळेगाव दाभाडे, पुणे.** | | |
| १. | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |
| **४. मंगेश भिमराव मोरे, वय ३० वर्षे रा. माळी नगर वडगाव मावळ, पुणे.** | | |
| १ | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |
| २ | कामशेत | २५२/२०२२ भादंवि. ३०७,३२६ |
| ३ | कामशेत | ३९८/२०२० भादंवि. ३०७,३२६ |
| ४ | वडगाव | १८०/२०१९ भादंवि.३०७,३२३ |
| ५ | वडगाव | १४४/२०१९ आर्म ॲक्ट ३(२५). |
| ६ | वडगाव | २४५/२०१८ भादंवि.३९४,३८५,५०४,५०६,३४ |
| ७ | वडगाव | २३३/२०१८ भादंवि. १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६,४२७ |
| ८ | वडगाव | ७३/२०१५ भादंवि.३९४,३४ |
| **५. अनिल वसंत पवार, वय ३९ वर्षे रा. सिध्दार्थ नगर, तळेगाव दाभाडे, पुणे** | | |
| १ | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |

| | | |
|---|---|---|
| **६. अक्षय ऊर्फ आर्ची विनोद चौधरी, वय २८ वर्षे, रा. सिध्दार्थनगर, तळेगाव दाभाडे,पुणे** | | |
| १ | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |
| २ | कोपरगाव | ८८/२०२० भादंवि ३०२, रॉयट |
| ३ | तळेगाव | ६०६/२०१९ भादंवि.३९२,३४ |
| ४ | तळेगाव | ५९०/२०१९ भादंवि.३२४,३२३,५०४,५०६,३४ |
| ५ | तळेगाव | ६४३/२०१८ भादंवि.३२४,३२३,५०४ |
| **७. देवराज रा. जळगाव जामोद जवळ, मध्यप्रदेश बॉर्डर जवळ, बुलढाणा** | | |
| १ | तळेगाव | २९५/२०२३ भादंवि.१२० ब,११५,३४ आम्र ॲक्ट ३(२५) |

**सन २०२३ मध्ये आजपावेतो पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील ११ संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील एकुण १३९ आरोपींवर मोका कायद्या अंतर्गत कारवाई केलेली आहे.**

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री. विनय कुमार चौबे साो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.डॉ संजय शिंदे, पोलीस सह आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, पिं. चिं. मा. स्वप्ना गोरे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चि. मा.काकासाहेब डोळे पोलीस उप-आयुक्त परि-२ पिं चि. मा.श्री सतिश माने साो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चिं. मा श्री बाळासाहेब कोपनर साो. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, पिं चिं.,यांच्या मार्गदर्शनाखाली जितेद्र कदम, पोलीस निरीक्षक, दरोडा विरोधी पथक, बाळकृष्ण सावंत वपोनि (पीसीबी) गुन्हे शाखा, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पोलीस अंमलदार आशिष बनकर, प्रविण कांबळे, गणेश कोकणे, गणेश हिंगे, गणेश सावंत, विनोद वीर, सुमित देवकर, सागर शेडगे, महेश खांडे, उमेश पुलगम, प्रविण माने, राजेश कौशल्य, राहुल खारगे, समिर रासकर, नितीन लोखंडे,चिंतामण सुपे व अमर कदम सर्व नेमणुक दरोडा विरोधी पथक गुन्हे शाखा यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड